क्रमांक 5694/22
धर्मादाय आयुक्त भवन,
[illegible]
मुंबई - ४०० ०३०.
31 OCT 2022

संदर्भ : बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पालघर कार्यालयांतील सर्व निरीक्षक यांची दि.१९.१०.२०२२ रोजीची बैठक.

**कार्यालयीन परिपत्रक क्रमांक 597, दिनांक ३१.१०.२०२२**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बृहन्मुंबई येथिल निरीक्षक यांची प्रत्यक्ष व ठाणे, रायगड आणि पालघर येथील निरीक्षक यांची दूरचित्रवाणी व्दारे (Online) दि.१९.१०.२०२२ रोजी मुख्यालय येथे एकत्रित सभा संपन्न झाली. सदर सभा मुख्यत्वेकरुन निरीक्षक यांच्या कामकाजा संदर्भात असणा-या तक्रारी, त्यांना येणा-या अडचणी व त्याकरीताच्या उपाययोजना याबाबत प्रशासकीय कारणास्तव आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत निरीक्षक यांचे कामकाजाशी संबंधित सर्व घटकांची सखोल चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने खालील मुद्दे प्रामुख्याने अधोरेखित झाले :-

१. निरीक्षक यांचेकडे सद्यस्थितीत दहा वर्षापेक्षा व पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित चौकशी प्रकरणाचे प्रमाण जास्त आहे.
२. सदर चौकशी प्रकरणे अधिक काळ प्रलंबित असल्याची कारणे i) पत्ता अपूर्ण अथवा तत्सम कारणास्तव संबंधितांना नोटीस पाठविता आली नाही. ii) नोटीस पाठविली परंतू विश्वस्त / संबंधित उपस्थित होत नाहीत. iii) विश्वस्त येतात परंतू तक्रारदार येत नाहीत. iv) जबाबाकरीता व अहवालाकरीता प्रलंबित.
३. निरीक्षक यांचेकडे प्रकरण चौकशीसाठी सोपविल्यावर संबंधित अधिकारी यांचेकडून त्याबाबत नियमित पाठपुरावा होत नाही.
४. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे संबंधित कलमांअतर्गत धर्मादाय उप आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त यांना स्वयंखुद्द अधिकार असतांना त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु होत नाही.

निरीक्षक चौकशी प्रकरणे प्रलंबित राहणे हे संबंधित न्यासास, न्यासाच्या लाभार्थ्यांस हितावह नाही. त्याकरीता खालील निर्देश देण्यात येत आहेत.

१. निरीक्षक यांनी सर्वप्रथम दहा वर्षापेक्षा व पाच वर्षापेक्षा जास्त काळ प्रलंबित चौकशी प्रकरणांची यादी करावी. त्यामध्ये प्राधान्यक्रम निश्चित करावा. सदर चौकशी प्रकरणे लवकरात लवकर पूर्ण करण्याकरीता एक निश्चित योजना करावी. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
२. दहा वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित प्रकरणांमध्ये एक ते दीड महिन्याच्या आत चौकशीची कार्यवाही पूर्ण करुन अहवाल सादर करावा.
३. ज्या प्रलंबित प्रकरणांमध्ये नोटीस बजाविता येत नाही, त्या प्रकरणांमध्ये त्या अनुषंगाने आदेशिकावाहकाचा अहवाल घ्यावा. संबंधित निरीक्षक यांनी न्यासाच्या नोंदणीकृत पत्त्यावर

प्रत्यक्ष जाऊन संबंधित न्यास जर त्या पत्त्यावर अस्तित्वात नसेल तर, तसा निरीक्षक यांनी अहवाल संबंधित अधिकारी यांचेसमोर पुढील आदेशाकरीता सादर करावा. जर न्यासाच्या नोंदणीकृत कार्यालयीन पत्त्यावर न्यास अस्तित्वात असेल तर, न्यासाच्या कार्यालयावर नोटीस डकवावी व तसा अहवाल संबंधित अधिकारी यांचेसमोर सादर करावा.

४. विश्वस्त उपस्थित राहून जबाब दिल्यास, त्यांना कागदपत्र सादर करण्याकरीता निश्चित मुदत दयावी. सदर मुदतीत त्यांनी कागदपत्र सादर न केल्यास, त्यांना नोटीस द्यावी. सदर नोटीसनुसार त्यांचे न्यासाची स्वत: पाहणी करुन संबंधित धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर अहवाल सादर करावा. संबंधित अधिकारी यांनी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या संबंधित तरतुदीनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही स्वयंखुद्द (Suo-motu) करावी.

५. तक्रारदार व विश्वस्त यांचे जबाब घेण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत निरीक्षक चौकशी अहवाल सादर करावा.

६. निरीक्षक यांनी चौकशी प्रकरणात वस्तुस्थिती दर्शक व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा. तसेच प्रकरणातील सर्व बाबी नीट तपासून महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील नेमक्या कोणत्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे विश्वस्तांना बंधनकारक होते व नेमक्या कोणत्या तरतुदींचा भंग केला आहे, ते उदधृत करावे. ज्या प्रकरणांत इतर संबंधितांचे अभिप्राय आवश्यक असतील त्याची नेमकी विचारणा त्या संबंधितांना करावी व तदनंतर परिपूर्ण अहवाल सादर करावा.

31-10-2022

(महेंद्र कं.महाजन)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.